# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:06.02.2025** **वारःगुरुवार**

---

1. दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी एकंदर 60 पूर्णांक 42 टक्के मतदानाची नोंद; येत्या शनिवारी मतमोजणी होणार.
2. उत्तर प्रदेशातल्या मिल्कीपूर आणि तामिळनाडूमधल्या इरोड पूर्व मतदारसंघातील विधानसभा पोटनिवडणूकही शांततेत संपन्न.
3. प्रयागराज इथल्या महाकुंभमध्ये आज जनजाती सांस्कृतिक संमेलनाचं आयोजन
4. अमेरिकेत अनधिकृत मार्गाने गेलेले 104 भारतीय मायदेशी परत आणि
5. भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या 50 षटकांच्या तीन सामन्यांच्या क्रिकेट मालिकेतला आज नागपूरात पहिला सामना

**<u>दिल्ली</u>**

दिल्ली विधानसभेच्या 70 जागांसाठी काल शांततेत मतदान झालं. निवडणूक आयोगान जारी केलेल्या आकडेवारीनूसार 60 पुर्णांक 42 टक्के मतदान झालं असून सर्वात जास्त 64 टक्के मतदान ईशान्य दिल्ली भागांत झालं. तर आग्नेय जिल्ह्यात सर्वात कमी मतदारांनी हजेरी लावली. येत्या शनिवारी मतमोजणी होईल.

दरम्यान, तामिळनाडूतील इरोड-पूर्व आणि उत्तर प्रदेशातील मिल्कीपूर इथं झालेल्या विधानसभा पोटनिवडणुकीसाठीही मतदान शांततेत पार पडलं. संध्याकाळी 5 वाजेपर्यंत इरोड-पूर्वमध्ये 64 टक्क्यांहून अधिक आणि मिल्कीपूरमध्ये एकंदर 65 पुर्णांक 25 टक्के मतदान झालं. मिल्कीपूरमध्ये भाजपचे चंद्रभानू पासवान, सपाचे अजित प्रसाद आणि आझाद समाज पक्षाचे संतोष कुमार यांच्यासह 10 उमेदवार रिंगणात होते. गेल्यावर्षीच्या लोकसभा निवडणुकीत फैजाबादमधून विजय मिळवल्यानंतर सपाचे नेते अवधेश प्रसाद यांनी ही जागा सोडली होती.

**<u>महाकुंभ</u>**

प्रयागराज इथं सुरू असलेल्या महाकुंभमध्ये आज जनजाती सांस्कृतिक संमेलन आयोजित करण्यात आलं आहे. यामध्ये देशभरातील पंधरा हजारांहून आधिक आदिवासी बांधव सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमात आदिवासी समाजासाठी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विविध राज्यातील 25 तरुणांना पुरस्कार देण्यात येणार आहे. तसंच आदिवासी संस्कृतीशी संबंधित एक प्रदर्शनही आयोजित करण्यात आलं असून देशभरातील 120 सांस्कृतिक नृत्य पथकं आपली कला सादर करणार  आहेत.

दरम्यान, प्रयागराज इथं सुरु असलेल्या कुंभमेळ्यात काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संगमस्थानावर स्नान करुन पुजाअर्चना केली. संगमवरील स्नान ही दैवी अनुभूतीचा क्षण असल्याचं पंतप्रधानांनी आपल्या समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. त्यात सहभागी झालेल्या कोट्यावधी लोकांप्रमाणेच आपणही भक्तीच्या भावनेने भारलेले आहेत. गंगा माता देशवासीयांना शांती, ज्ञान, चांगले आरोग्य आणि सौहार्दाचे आशीर्वाद देईल अशी आशा त्यांनी आपल्या संदेशात व्यक्त केली.

**अश्विनी वैष्णव**

माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल ओपन एआयचे मुख्य कार्यकारी अधिकारी सॅम अल्टमन यांची नवी दिल्लीत भेट घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कृत्रिम बुध्दीमत्तेचं लोकशाहीकरण करण्यासाठी प्रोत्साहन देत असून अल्टमन यांनी पंतप्रधानांच्या दूरदृष्टीचं कौतुक केलं आहे. असं वैष्णव यांनी सांगितलं. ओपन एआय आधारित तंत्रज्ञानावर आधारित विविध सुविधांचा विकास, एप्सची निर्मिती आणि प्रकल्प तयार करण्याबाबत अल्टमन यांच्याबरोबर सकारात्मक चर्चा झाल्याचं वैष्णव यांनी या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना सांगितलं.

**गृहमंत्री**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण ईशान्य भारत आता विकासाच्या मार्गावर असल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं. ते काल त्रिपुरा सरकारमधील 2800 हून अधिक नोकरीच्या नियुक्ती पत्रांच्या वितरण कार्यक्रमाला दूरदृश्यप्रणालीद्वारे संबोधित करत होते. गेल्या 10 वर्षात केंद्र सरकारनं त्रिपुरामध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी तीन करार केल्याचं गृहमंत्र्यांनी सांगितलं. त्रिपुरातील सशस्त्र गट संपुष्टात आले असून मुख्य प्रवाहात सामील झाले आहेत. मोदी सरकारनं ब्रु-रिआंग लोकांना कायमस्वरूपी निवास, शिक्षण, आरोग्य सेवा आणि नोकरीच्या संधी देऊन त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणला आहे, असंही अमित शहा यावेळी म्हणाले.

**आगाखान**

लाखो इस्माईली मुस्लिमांचे नेते प्रिन्स करीम आगा खान चौथे यांच्या निधनाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीव्र दु:ख व्यक्त केलं आहे. त्यांचं मंगळवारी पोर्तुगालमध्ये वयाच्या 88 व्या वर्षी निधन झाले. प्रिन्स करीम आगा खान हे एक दूरदर्शी इमाम होते ज्यांनी आपले जीवन सेवा आणि अध्यात्मासाठी समर्पित केले. आरोग्य, शिक्षण, ग्रामीण विकास आणि महिला सक्षमीकरण यासारख्या क्षेत्रात प्रिन्स करीम आगा खान चतुर्थ यांचे योगदान अनेक लोकांना प्रेरणा देत राहील अशा शोकभावना पंतप्रधानांनी आपल्या समाजमाध्यमावरील संदेशात व्यक्त केल्या आहेत. दरम्यान प्रिन्स रहिम अल हुसैनी नवे आगा खान असतील. प्रिन्स करीम आगा खान चौथे यांच्या निधनानंतर 53 वर्षीय प्रिन्स रहीम, यांना वडिलोपार्जित परंपरेनूसार हे पद मिळालं आहे. ते इस्माईलींचे 50 वे वंशपरंपरागत इमाम बनले आहेत.

**अमेरिकन प्रवासी**

अमेरिकेत अनधिकृत मार्गाने गेलेल्या 104 भारतीयांना घेऊन अमेरिकन वायुदलाचं विमान काल अमृतसरमध्ये पोहोचलं. यामधील 30 जण पंजाबमधील असून इतर चंदिगड, हरियाणा, गुजरात, महाराष्ट्र आणि उत्तरप्रदेशातील रहिवासी आहेत. कोणतेही अधिकृत कागदपत्र नसलेल्या या प्रवाशांची चौकशी आणि

ओळखपरेड सध्या सुरु आहे. अमृतसरमधील अधिकारी आणि विमानतळ प्रशासानाच्या सहकार्यानं हे काम सुरु आहे.

**गाझा**

अमेरिकन राष्ट्रध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी गाझा पट्टी ताब्यात घेण्याबाबत मांडलेल्या प्रस्तावाला पॅलेस्टिनी नेते तसंच इजिप्त, जॉर्डन आणि सौदी अरेबियाच्या नेत्यांनी या प्रस्तावाचा निषेध केला आहे. पॅलेस्टिनींचे अधिकार तसंच आंतरराष्ट्रीय कायद्याचा भंग असल्याचं या नेत्यांनी म्हटलं आहे. दोन आठवड्यापुर्वी गाझापट्टीत युध्दबंदी लागू झाल्यानंतर इस्त्राईल आणि पॅलेस्टाइनमधील कैद केलेल्या नागरिकांना सोडण्याची प्रक्रिया सुरु आहे. दरम्यान आपण गाझा पट्टीचा ताबा घेऊन पॅलेस्टीनी नागरिकांना स्थिरावण्यात मदत करु असा प्रस्ताव अमेरिकन राष्ट्राध्यक्षांनी मांडला आहे

**फ्रांस**

फ्रांसच्या सरकारचा संसदेतील अर्थसंकल्पाच्या मंजुरीचा मार्ग काल मोकळा झाला. यापूर्वी पंतप्रधान फ्रँकोइस बायरो यांनी कायदेतज्ञांच्या सल्ला न घेता अर्थसंकल्पीय विधेयकाला मंजुरी मिळवण्यासाठी, विशेष संवैधानिक अधिकारांचा वापर केला होता. ज्यावर जोरदार टिका झाली आणि त्यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मात्र काल झालेल्या मतदानात संसदेतील सदस्यांनी त्यांना साथ दिली आणि बायरो यांच्या बाजूने मतदान केलं.

**एस जयशंकर**

परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉक्टर एस जयशंकर यांनी काल शांघाय सहकार्य परिषदेचे अर्थात SCOचे नवनियुक्त मुख्य सचिव नुरलन इरमेमेकबाव यांची नवी दिल्ली इथं भेट घेतली आणि या पदावर नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचं अभिनंदन केलं. भारताचं शांघाय परिषदेतील काम आणि सुरक्षित SCO कसं असावं याविषयावर यावेळी चर्चा झाली, असं जयशंकर यांनी आपल्या समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. यावेळी त्यांनी इजिप्तचे परराष्ट्रमंत्री डॉ बद्र अबदेलट्टी यांच्याबरोबर दूरध्वनीवरुन चर्चा केली. दोनही देशांदरम्यानचे द्विपक्षीय संबंध आणि नव्यानं विकसित करण्यात आलेल्या सुविधांबाबत यावेळी चर्चा झाली.

**मुख्यमंत्री-बीड**

महाराष्ट्रातल्या चार नदीजोड प्रकल्पांचं काम येत्या वर्षभरात सुरू करण्यात येईल अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. बीड जिल्ह्यात आष्टी तालुक्यातल्या खुंटेफळ इथं आष्टी उपसा सिंचन योजनेच्या कामाचं भूमिपूजन करताना ते काल बोलत होते.

**बांगलादेश**

बांगलादेशमध्ये, राजधानी ढाका इथं बंगबंधू स्मारक संग्रहालय काल रात्री संतप्त जमावाने बुलडोझरने पाडले. धनमोंडी हे संग्रहालय बांगलादेशचे संस्थापक राष्ट्रपती आणि माजी पंतप्रधान शेख हसीनाचे वडील शेख मुजीबुर रहमान यांचे वैयक्तिक निवासस्थान होते. माजी पंतप्रधान शेख हसीना यांनी रात्री 9 वाजता त्यांच्या पक्षाच्या बंदी घातलेल्या विद्यार्थी संघटनेला दुरस्थ माध्यमातून भाषण देण्याचं नियोजन होतं. याला विरोध दर्शवत कट्टरपंथीयांनी हा हल्ला केला. असा प्राथमिक अंदाज काही माध्यमांवरील बातम्यांमध्ये वर्तवण्यात आला आहे.

**<u>टेबल टेनिस</u>**

सिंगापूर इथं सुरु असलेल्या टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या मानव ठक्कर आणि मानुष शाह या पुरुष दुहेरी जोडीचा सामना उपांत्यपूर्व फेरीl चौथ्या मानांकित फ्रेंच जोडी फ्लोरियन बोरासॉड आणि एस्टेबन डोरशी होणार आहे. मानव आणि मानुष यांनी काल हाँगकाँगच्या वान-चुंग-टिंग आणि यी-क्वान-तो यांच्यावर 3-0 असा दमदार विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि इंग्लंड यांच्यातला तीन 50 षटकांच्या सामन्यांच्या मालिकेतला पहिला क्रिकेट सामना आज नागपूरमधल्या विदर्भ क्रिकेट संघटनेच्या मैदानावर खेळवला जाईल. हा सामना दुपारी दीड वाजता सुरू होईल.या मालिकेतला दुसरा सामना येत्या रविवारी ओडिशामधल्या कटकमध्ये तर तिसरा आणि शेवटचा 50 षटकांचा सामना 12 फेब्रुवारीला अहमदाबादमध्ये होणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार